*राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*
*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील
**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक :- ३३४३/२०१८/नंदुरबार**

१ श्री. ईश्वर उध्दव चौधरी, : अपिलार्थी
रा. मु. पो. धुरखेडा,
ता. शहादा, जि. नंदुरबार.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा : उत्तरवादी
ग्रामसेवक,
ग्रामपंचायत कार्यालय, धुरखेडा,
ता.शहादा, जि.नंदुरबार.

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (ग्रा.पं.),
पंचायत समिती, शहादा,
ता. शहादा, जि. नंदुरबार.

**विवेचन**

अपिलार्थी यांनी दिनांक ०६/०८/२०१८ रोजीच्या माहिती अर्जान्वये सन २०१५-२०१६ या कालावधीची पुढीलप्रमाणे माहिती मागितली आहे. १) १४ वा वित्त आयोगाअंतर्गत आपल्या ग्रामपंचायतीला एकुण किती निधी आला. २) १४ वा वित्त आयोग योजनेचे बँक खाते नं. व बँक पासबुक स्टेटमेंटच्या छायांकित प्रती. ३) सदर निधीतून कोणकोणते कामे करण्यात आले व सध्या सुरु आहेत याची माहिती मिळावी. ४) झालेल्या कामांची फोटो कॉपी मिळावी. (१. काम सुरु होण्यापुर्वी, २. काम सुरु असतांना, ३. काम पुर्ण झाल्यावर). ५) साहित्य खरेदी करतांना/कामाचा ठेका देतांना अवलंबण्यात आलेल्या पध्दती बाबत सविस्तर माहिती मिळावी. ६) १४ वा वित्त आयोग योजनेच्या नोंदवहीच्या छायांकित प्रती (कॅशबुक). ७) कामाच्या मोजमापाची नोंदवही, ८) प्रमाणक (व्हाऊचर) नोंदवही. ९) १४ वा वित्त आयोग निधी खर्चासाठी ज्या ग्रामसभेची मान्यता घेण्यात आली, त्या ग्रामसभेच्या प्रोसिडिंग बुकच्या छायांकित प्रती त्यासंदर्भात आयोगाकडे दाखल करण्यात आलेल्या द्वितीय अपिलामध्ये आयोगाने दिनांक २२/०१/२०२० रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिलेले आहेत:-

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्री. आर. एन.मोरे यांनी अपिलार्थी यांचया दिनांक ०६/०८/२०१८ रोजीच्या माहिती अर्जाला अनुसरुन विहित मुदतीत तसेच प्रथम अपिलाच्या निर्णयानंतरही माहिती/वस्तुस्थितीदर्शक उत्तर पुरविले नाही. म्हणून त्यांचेविरुध्द माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये शास्तीची कार्यवाही का करण्यात येऊ नये, याचा लेखी

खुलासा त्यांनी आयोगाकडे सादर करावा. अन्यथा, त्यांचे काहीही म्हणणे नाही असे गृहीत धरुन शास्तीचे आदेश कायम केले जाऊ शकतील, याची नोंद घ्यावी.

उपरोक्त आदेशांच्या अनुषंगाने तत्कालीन जन माहिती अधिकारी यांचा खुलासा अंतिम करण्यासाठी दि. १९/१२/२०२३ रोजी आयोजित सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत अपिलासंदर्भातील सर्व कागदपत्रांचे अवलोकन केल्यानंतर आयोग या निष्कर्षाला येत आहे की, या प्रकरणी तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्री. आर. एन.मोरे यांनी खुलासा आयोगाकडे सादर केलेला नाही. त्यामुळे तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्री. आर. एन.मोरे यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २७/०३/२०१७ रोजीच्या माहिती अर्जास अनुसरुन माहिती देण्यास हेतुपुरस्सर टाळाटाळ केल्याचे स्पष्ट होते. त्यांनी अधिनियमातील कलम ७(१) च्या तरतुदींचे उल्लंघन केले आहे. म्हणून त्यांचेवर अधिनियमातील कलम २०(१) नुसार शास्तीची कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, श्री. आर. एन.मोरे यांनी कोणताही खुलासा सादर केलेला नसल्याने उपरोक्त विवेचनाच्या पार्श्वभुमीवर आयोगाच्या मते त्यांचेविरुद्ध माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम २०(१) अन्वये रुपये ३०००/- (तीन हजार रुपये मात्र) शास्तीची कार्यवाही करण्यात येत आहे. सदर शास्तीची रक्कम प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (ग्रा.पं.), पंचायत समिती, शहादा यांनी तत्कालीन जन माहिती अधिकारी यांच्या वेतनातून कपात करुन सदर रकमेचा भरणा "**००७०, इतर प्रशासनिक सेवा, (०१) (१८) माहितीचा अधिकार दंड व शुल्क (००७०-०७८१)** " या लेखाशीर्षाखाली जमा करण्याची कार्यवाही करावी व सदर कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर त्याबाबत आयोगास अवगत करावे.

२) प्रस्तुत अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

**प्रती,**

१) तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक श्री. आर.एन.मोरे व ग्रामपंचायत धुरखेडा, ता. शहादा, जि. नंदुरबार.

---

प्रत,

गटविकास अधिकारी, पंचायत समिती, शहादा, ता.शहादा, जि. नंदुरबार
यांना उपरोक्त आदेशानुसार माहितीस्तव आणि उचित कार्यवाहीसाठी अग्रेषित.

---

क्रमांक : रामाआ-नाशिक/द्वि.अ. खुलासा क्र./३३४३ /२०१८/नंदुरबार ओ- 2yee दिनांक 11 SEP 2024